# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ७६ वा ❑ रविवार दि.२७ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## पाकव्याप्त काश्मीर घेण्याची धोरणात्मक संधी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानवर मोठी कारवाई करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याबाबतचे संकेतही दिले. भारतीय सैन्य पाकव्याप्त काश्मीरमध्ये थेट लष्करी कारवाई करू शकते. त्यासाठी भारताची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे हल्ल्याच्या तयारीत आहेत. मोठ्या कारवाईपूर्वी उत्तर भारतातील एका भागाचे हवाई क्षेत्र बंद करण्यात आले आहे.

पीओके हा दहशतवादाचा गड आहे. सर्व दहशतवादी लाँच पॅड पीओकेमध्ये आहेत. दहशतवाद्यांचे हे लाँच पॅड उद्धवस्थ करण्याची योजना भारताची आहे. भारताच्या गुप्तचर संस्था आणि लष्कराला पीओकेमधील प्रत्येक दहशतवादी लाँच पॅडची संपूर्ण माहिती मिळाली आहे. पीओकेमध्ये दहशतवाद्यांसाठी किमान १७ प्रशिक्षण केंद्रे आणि ३७ मोठे लाँचिंग पॅड आहेत. या छावण्यांमध्ये पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर यांचे सैन्य दहशतवाद्यांना प्रशिक्षण देत आहे.

पीओकेच्या कोणत्या भागात दहशतवाद्यांचे किती लाँच पॅड आहेत? त्यांची नाव काय आहे? त्याचा पत्ता काय आहे? हे उघड झाले आहे. पाकिस्तानी सैन्य दहशतवाद्यांना भारतात घुसखोरी करण्यापूर्वी रेकी करणेही शिकवत असते. पीओकेमधील दहशतवादी घुसखोरीसाठी पाकिस्तानी सैन्याच्या मदतीने कशी रेकी करतात त्याचा हा पुरावा आहे. दहशतवाद्यांच्या ३७ लाँच पॅडपैकी २० लाँच पॅड पीओकेमध्ये आहेत.

पाकिस्तानी सेना प्रशिक्षण देऊन या भागातून दहशतवाद्यांना घुसखोरी करण्यास मदत करते. हा भाग दुर्गम आहे. या भागात जंगल आहे. पहलगाममध्ये पर्यटकांवर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना पाकिस्तान लष्कराने प्रशिक्षण दिले होते. त्यासंदर्भातील पुरावे भारतीय सुरक्षा संस्थांना मिळाले आहे. पाकिस्तानी लष्कराला पहलगाव हल्ल्याची माहिती होती. अनेक दिवस त्यासाठी तयारी केली गेली होती.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने सिंधू करार रद्द करताच पाकिस्ताने देखील शिमला करार स्थगित करण्याचे घोषित केले. पाक व्याप्त काश्मीर ताब्यात घेण्यासाठी भारताला आता एक सुवर्ण संधी चालून आली आहे.पाकिस्तानचे हे पाऊल भारतासाठी धक्का नाही तर एक धोरणात्मक संधी आहे. आता प्रश्न असा आहे की पाकिस्तानचे हे पाऊल भारताच्या हिताचे कसे आहे? भारत आता द्विपक्षीयतेच्या बंधनातून मुक्त झाला आहे कारण शिमला करारानुसार, भारत–पाकिस्तान वाद केवळ द्विपक्षीय पद्धतीने सोडवायचे होते. भारत आता आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर हा मुद्दा उपस्थित करण्यास मोकळा आहे आणि विशेषतः दहशतवादासारख्या मुद्द्यांवर व्यापक जागतिक पाठिंबा मिळवू शकतो.दुसरे म्हणजे, या कृतीमुळे पाकिस्तानची विश्वासार्हता खराब झाली आहे कारण शिमला करार संयुक्त राष्ट्रांच्या सनदेनुसार होता आणि तो आंतरराष्ट्रीय वचनबद्धता मानला जातो. पाकिस्तानच्या रद्दीकरणामुळे त्यांची अस्थिर आणि बेजबाबदार प्रतिमा आणखी बळकट होते. यामुळे जागतिक पातळीवर भारताला राजनैतिक फायदा मिळेल.तिसरे म्हणजे, पाकिस्तानने करार रद्द केल्याने, भारताला आता राजनैतिक आक्रमक होण्याची संधी आहे, कारण भारत आता इतर देशांसमोर, विशेषतः पाकिस्तानने पुरस्कृत केलेल्या सततच्या दहशतवादावर आणि सीमा उल्लंघनावर, उघडपणे आपला दृष्टिकोन मांडू शकतो. भारत हा मुद्दा २०, आणि सारख्या व्यासपीठांवर जोरदारपणे उपस्थित करू शकतो, जो या कराराने बांधील असल्यामुळे तो यापूर्वी उपस्थित करू शकला नव्हता.चौथे, नियंत्रण रेषेवरील जैसे थे स्थिती राखण्यास भारत आता बांधील नसल्याने नियंत्रण रेषेवरील जैसे थे स्थिती आता मजबूत करता येईल. यामुळे पाकिस्तानबद्दल धोरणात्मकदृष्ट्या अधिक सक्रिय संरक्षण धोरण निर्माण होऊ शकते – सर्जिकल स्ट्राईक (२०१६) आणि हवाई स्ट्राईक (२०१९) सारख्या उपाययोजनांना अधिक कायदेशीर पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे.

# घोळमटण: मुंबईत गाजलेले नाटक आज जालन्यात

ज्योतिर्मय साहित्य

**जालना** – महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत अनेक पारितोषिके मिळवून मुंबईतील अंतिम फेरीत सादर झालेले घोळमटण हे नाटक पाहण्याची संधी आज जालनेकरांना मिळणार आहे. जालन्यातील रसिकांच्या खास आग्रहावरून २७ एप्रिल, रविवार रोजी जेईएस महाविद्यालयात सायंकाळी ६ वाजता या नाटकाचा मोफत प्रयोग सादर होईल. या नाटकाची गोष्ट शेतकर्याची असली तरी एका वेगळ्या विषयावर बेतलेली आहे.

अडचणीत आलेला सामान्य माणूस सुचतील ते उपाय करत जातो आणि त्यातून तो कसा नव्याच संकटांमध्ये गुरफटत जातो याचे अतिशय जिवंत सादरीकरण घोळमटण या दोन अंकी नाटकात आहे. जालना येथील नाट्यांकुर व उत्कर्ष थिएटरने यंदा राज्य नाट्य स्पर्धेत इतिहास घडवला. सुनील गव्हाणे यांची ही संकल्पना असून सतीश लिंगडे लिखित व सुमीत शर्मा दिग्दर्शित घोळमटण हे दोन अंकी नाटक प्राथमिक फेरीतून अनेक बक्षिसे मिळवत अंतिम फेरीत दाखल झाले होते. जालन्याच्या कलावंतांनी मुंबईत या नाटकाचा प्रयोग ४ मार्च २०२५ रोजी मोठ्या दिमाखात सादर केला. तीस वर्षांनंतर जालन्याचे नाटक अंतिम फेरीत दाखल झाल्यामुळे सर्वच जालनेकरांनी तेव्हा कलावंतांवर अभिनंदनाचा वर्षाव केला होता.

घोळमटण या नाटकात लहानमोठे असे सुमारे वीस कलावंत असले तरी दिग्दर्शक सुमीत शर्मा यांनी मोठ्या कौशल्याने त्यांचे फ्रेमिंग केले आहे. लेखक सतीश लिंगडे यांचे खणखणीत संवाद प्रेक्षकांचे मनोरंजन तर करतातच, पण शेवटी डोळ्यात पाणीही आणतात. या नाटकाचे गीतलेखन विनोद जैतमहाल यांनी केले असून शोएब शेख व त्यांचे सहकारी हे गीत प्रत्यक्ष मंचावरून सादर करतात.

या नाटकात सतीश लिंगडे, रेखा चव्हाण, तेजस्विनी वाघमारे, प्रेरणा सराफ, सुंदर कुँवरपुरिया, सुनील शर्मा, विनोद जैतमहाल, पवनकुमार खांदे, सुनील गव्हाणे, सानवी संबरकर, सुकृती काकडे, गणेश लोखंडे, कपिल रोडगे, ज्ञानेश्वर म्हळसणे, कल्याणी चन्ने, सुमीत शर्मा, अथांग लिंगडे, मंथन लिंगडे, आद्या चव्हाण, नीती चव्हाण, प्रांजल सपकाळ या सर्वच कलाकारांनी उत्कृष्ट अभिनयाने रंग भरले आहेत. प्रकाशयोजना संतोष गौतम, रंगभूषा वर्षाराणी कोळवले, संध्या शर्मा, नेपथ्य संजय भिंगारे, मुकुंद दुसे, संगीत नीलेश सपकाळ, आनंद घुले, ओंकार सुलाखे, गायक शोएब शेख या पडद्यामागील कलावंतांनी नाटक जिवंत केले आहे. आजवर छत्रपती संभाजीनगर, जालना,



मुंबई, बदनापूर, पाथ्री अशा अनेक ठिकाणी घोळमटणचे प्रयोग झाले असून सर्वच ठिकाणी प्रेक्षकांनी या प्रयोगांना भरभरून प्रतिसाद दिला आहे. आता जालनेकरांना पुन्हा हा प्रयोग पाहण्याची संधी असून घोळमटण नाटकाचा मोफत प्रयोग वसंतोत्सवात सादर होणार आहे. जालन्याच्या नाट्यरसिकांनी मोठ्या संख्येने या प्रयोगास उपस्थित राहून प्रयोगाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन प्राचार्य गणेश अग्निहोत्री यांनी केले आहे.

# बुद्ध विचाराशिवाय देशाचा विकास शक्य नाही–डॉ.प्रदीप आगलावे

## बुद्ध विहार समन्वय समिती द्वारा आयोजित बुद्ध विहारो का ३ रा राष्ट्रीय अधिवेशनाचे मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात उद्घाटन

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – स्वतंत्र, समता आणि बंधुता सांगणारे बुद्ध विचारच या देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणू शकतात. आज बुद्ध धम्म हा विश्व धम्म बनत चालला आहे. आमचा प्राचीन धर्म हा वैदिक किंवा ब्राम्हणी धर्म नसून बौद्ध धम्मच आहे, हे आता जवळजवळ सिद्ध होत आहे. त्यामुळे ज्यांनी हे चुकीचे पेरण्याचे षडयंत्र केले होते ते अस्वस्थ झाले आहेत. त्यामुळे ते कोणती चाल आणखी चालतील हे ओळखता येणार नाही, त्यामुळे आपण सजग, जागृत राहून संस्कृती टिकविण्यासाठी बौद्ध विहारांमध्ये समन्वय साधण्याची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन, चरित्र व साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे यांनी केले.


ते स्थानिक संत एकनाथ रंगमंदिर येथे बुद्ध विहार समन्वय समिती द्वारा आयोजित दोन दिवसीय बुद्ध विहारो का ३ रा राष्ट्रीय अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी बोलत होते. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी भिक्खू विनयरक्खीता महास्थवीर (मध्यप्रदेश) हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कॉ. धनाजी गुरव, प्रदीप चकमा (त्रिपुरा), प्राचार्य डॉ. एम.ए. वाहुळ, स्वागताध्यक्ष प्राचार्य सुनील वाकेकर, चेतन कांबळे, बुद्ध विहार समन्वय समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक सरस्वती आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात बोलताना अशोक सरस्वती बौद्ध बोलताना म्हणाले की, बौद्ध विहारांचे समन्वय नसल्यामुळे बौध्द विहारांची सांस्कृतिक चळवळ उभी राहू शकली नाही. ती उभी करण्याचा राष्ट्रीय पातळीवरील हा उपक्रम आणि सुरू करून आज २३ राज्यातील प्रतिनिधी या उपक्रमाशी जुळलेले आहे. या उपक्रमाद्वारे भारत बौद्धमय करण्यामध्ये योगदान देण्याचे काम बुद्ध विहार समन्वय समितीद्वारे केले जात असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सकाळी ८:०० वाजता पुज्यनिय भिक्खू संघ आणि समता सैनिक दल यांच्या उपस्थितीत धम्म ध्वजारोहण आणि मानवंदना देण्यात आली. त्यानंतर भिक्खू डॉ. चांद्रबोधी, भिक्खू ज्ञानरक्षित आणि भिक्खू संघाच्या उपस्थितीत वंदना व सुत्तपठन घेण्यात आले. त्यानंतर प्रा. भारत सिरसाट संपादित स्मरणिकेचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

बुद्ध गया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याची मागणी या अधिवेशनाद्वारे करण्यात आली तसेच त्यासाठी होणाऱ्या आंदोलनात देशभरातून जनआंदोलन उभे करण्याचा ठराव या अधिवेशनात घेण्यात आला.

कॉ. धनाजी गुरव बोलताना म्हणाले की, बौद्ध धर्माची दीक्षा न घेता जे लोक, जे समूह बुद्ध विचारांचे आचरण करतात, त्या समूहांना बौद्ध समाजाकडे




वळविण्यासाठी ठोस कार्यक्रम निर्माण करण्याची आवश्यकता असून त्याची मोठी जबाबदारी बुद्ध विहारांची आहे. आरएसएसने भारतातील लोकशाही संपविण्याचे धोरण आखले आहे. प्रतिकांचे, महापुरुषांचे त्यांना पूरक होईल त्या पद्धतीने मांडण्याचे काम सुरू आहे, लोकशाही वाचविण्यासाठी बुद्ध विचारांची पेरणी व्यापक स्वरूपात होण्याची आवश्यकता आहे.

# डॉ.विजय दहिफळे भारत गौरव अलंकरण पुरस्काराने सन्मानित




ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या प्रतिभेच्या आणि बुद्धिमत्तेच्या माध्यमातून असाधारण काम करणाऱ्या पुरुष आणि महिला व्यक्ती आणि संस्थांना विक्रम प्रस्थापित करण्यासाठी आणि पुरस्कार देण्यासाठी कार्य करते. आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्देशित शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वचनबद्धता आणि विकसित भारताच्या संकल्पनेचे तत्वतः पालन हे रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सचे मार्गदर्शक तत्व आहे. रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स हे वर्ल्ड सेव्हन वंडर्स पब्लिकेशन आणि आयकॉनिक रेडियंट रेकॉर्ड वेलफेअर फाउंडेशन द्वारे चालवले जाते, जे भारत सरकारच्या एमएसएमई मंत्रालय आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय अंतर्गत नोंदणीकृत आहे. हे रेकॉर्ड भारत सरकारच्या आयएसबीएन अंतर्गत प्रकाशित केले आहे. या कामगिरीचा गौरव भारत आणि आशियाई देशांमध्ये आयोजित विविध समारंभांद्वारे देखील केला जातो. रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स ने देशातील विविध राज्यपाल, पद्मश्री, पद्मविभूषण विजेते, रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते, विद्यापीठांचे कुलगुरू, रजिस्ट्रार, भारतीय लष्कर, हवाई दल, नौदलाचे वरिष्ठ अधिकारी, जी–२० चे संचालक स्तरावरील अधिकारी, IAS, IPS, IFS, IRS मधील भारतातील पदस्थ अधिकारी, अभिनेते, साहित्यिक आणि प्रसिद्ध खेळाडू आणि व्यक्तिमत्त्वांना सन्मानित केले आहे. अलिकडेच रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सला भारत सरकारच्या जी–२० सचिवालयाच्या संचालक स्तरावर आणि भारताच्या राज्यपालांनी सन्मानित आणि कौतुकास्पद केले आहे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की आजपर्यंत जागतिक सेव्हन वंडर्स प्रकाशनाद्वारे आंतरराष्ट्रीय विक्रम देखील स्थापित केले गेले आहेत. म्हणूनच, हा विक्रम साध्य करण्यास इच्छुक असलेल्या देश आणि जगभरातील इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या असाधारण प्रतिभेचे प्रदर्शन करून रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदणीसाठी अर्ज सादर करावा. याच मालिकेत, महाराष्ट्र राज्यातील डॉ. विजय दहीफळे (युरोलॉजिस्ट) यांना आरोग्य सेवेच्या क्षेत्रात त्यांच्या असाधारण कार्याबद्दल रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये विक्रमाने सन्मानित करण्यात आले आहे.

आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड लेखक आणि वर्ल्ड सेव्हन वंडर्स पब्लिकेशन आणि रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सचे मुख्य संपादक डॉ. क्रांती महाजन यांनी मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रीय ज्युरी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विजय दहीफळे यांना भारत गौरव पुरस्कार आणि आंतरराष्ट्रीय रेकॉर्ड प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह – पदक देऊन सन्मानित केले आहे. या सन्मानाबद्दल डॉ. विजय दहीफळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# ऐकावं ते नवलंच

## 65 वर्षीय आजी झाल्या रिक्षा ड्रायव्हर, आजींच्या रिक्षाला प्रवाशांची एक नंबर पसंती

सातारा : आवड असली की सवड निर्माण होते असं म्हणतात याची प्रचिती सातारा जिल्ह्यातील नांदगाव येथील 65 वर्षीय आजी मंगल आवळे यांना आली आहे. घरात असलेली रिक्षा आपल्या मुलाकडून त्या चालवायला शिकल्या आणि बघता बघता 65 वर्षीय मंगल आवळे रिक्षा चालवू लागल्या. आज त्यांच्या रिक्षातून जायला प्रवाशांची पसंती मिळत आहे. गर्दी असो वा चढ उतार या आजी न घाबरता सराईतपणे कुठेही रिक्षा घेऊन जातात.

65 वर्ष वय असतानाही त्यांच्या इच्छाशक्तीची दुर्दम्य झेप तरुणांनाही लाजवणारी आहे. आज त्या उंडाळे भागातील तसेच सवादे जिंती या भागातील दुर्गम भागातही रिक्षा घेऊन जातात. केवळ दोन ते तीन दिवसात आजी रिक्षा शिकल्या आणि गेली 15 दिवस या आजीने आपल्या रिक्षाचा प्रवास सुरू केला आहे. उंडाळे परिसरात आता या आजी रिक्षावाल्या आजी म्हणून प्रसिद्ध झाल्या आहेत. आजच्या मोबाईलमध्ये अडकलेल्या तरुणाईपुढे मंगल आवळे या रिक्षावाल्या आजीने चांगलाच आदर्श निर्माण केला आहे. दरम्यान, या रिक्षा चालवणाऱ्या 65 वर्षीय आजींची सर्वत्र सध्या चर्चा होत आहे. तसेच त्यांच्या या कृतीचं सर्वत्र कौतुक देखील होत असल्याचं पाहायला मिळत आहे.

**सरकारकडून महिलांना 10 हजार पिंक इ रिक्षांचे वाटप**

राज्यातील दहा हजार महिलांना रोजगार देण्याचा उद्देशाने सरकारने राज्यात 10 हजार महिलांना पिंक इ-रिक्षाचे वाटप केले आहे. शहरात महिलांना सुरक्षित सार्वजनिक वाहतूक तिचे साधन मिळावे, रात्री अप-रात्री महिला या पिंक इ-रिक्षाच्या माध्यमातून सुरक्षित फिरू शकतील, असे उद्दिष्टही या योजनेमागे असल्याची प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली आहे. पिंक इ-रिक्षा योजनेच्या पहिल्या टप्प्याचा वितरण नागपुरात पार पडला. महाराष्ट्र सरकारने महिलांसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. राज्यातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पिंक ई रिक्षा योजना सुरु करण्यात आली आहे.





- विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

## आनंदी पहाट...


## ध्यानीमनी धनाचे धनी होण्याची इच्छा घातक

**ज्योतिर्मय साहित्य**

दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. असं म्हंटलं जातं कि आपल्या प्रत्येकाची दोन मनं कार्यरत असतात. एक अंतर्मन कि जे सुप्त स्वरुपात कार्यरत असतं आणि दुसरं बाह्यमन,ज्याचं कार्य जाणीवपूर्वक सुरु असतं. काहीजणांना ध्यानीमनी धनाचे धनी व्हावं असंच वाटत असतं. मग ते धन कसं मिळालं ह्यापेक्षा देखील किती मिळालं ह्याचंच महत्व त्यांना अधिक वाटत असतं. धनी होण्याव्यतिरिक्त त्यांच्या काहीच ध्यानांत येत नसतं. स्वतःला सिद्ध करण्याची जिद्द असणे हे कमीपणाचे लक्षण असू शकते का? कि स्वतःला सिद्ध न करताच प्रसिद्ध होण्याचं महत्व अधिक असतं?शिक्षणातील कोणताही क्षण विलक्षण न होता, शैक्षणिक यशप्राप्ती न मिळता देखील स्वतःला प्रकांड पंडित समजणाऱ्या व्यक्तीला आपल्यांत काही उणिवा असू शकतात ह्याची जाणीवच नसल्याचं दिसून येतं.

अशिक्षित असणं हा निश्चितच गुन्हा नाही किंवा दोषही नाही. परंतू शिक्षणाचा गंधही नसलेल्या व्यक्तीच्या स्वतःच्या नावापुढे जेव्हा ''डॉ.'' ची उपाधी लावली जात असते, तेव्हा मात्र सिद्ध होतं कि पैशानं काहीही विकत घेता येऊ शकतं. स्वतः मेहनत घेऊन, इमानदारीनं शिक्षण घेऊन पी. एच. डी. मिळवून स्वतःला सिद्ध करणारे कदाचित फारसे प्रसिद्ध होत नसतील, परंतू त्यांना पी. एच. डी. मिळवण्यासाठी तथाकथित शिक्षण महर्षींनी मांडलेल्या शिक्षणाच्या बाजारांत कोणताही सौदा झालेला नसतो, हे अधिक महत्वाचं. डी. लिट. / डॉक्टरेट मिळवणं म्हणजे भाजी मंडईतून मिरच्या-कोथिंबीर आणण्यासारखं आहे का? शिक्षणाचा बाजार मांडलेल्या ह्या प्रकांड पंडितांना त्यांच्या कुकर्माची जाणीव आपण करून द्यायला नकोय का?

## अनोखे अंदमान




**ज्योतिर्मय साहित्य**

रॉस बेटावरील ही मनमोहक सफर संपवून दुपारी आम्ही नॉर्थ बे या ठिकाणी आलो. हे ठिकाण तर अतिशय सुंदर आहे. आमचा संपूर्ण दिवस जणू निळ्या हिरव्या रंगाच्या स्वप्नात रंगला होता असे म्हणावे लागेल.

नॉर्थ बेच्या किनाऱ्यावर पाऊल टाकताच एका वेगळ्याच आनंदाच्या लहरी आपल्याला व्यापतात. पायांखालची शुभ्र वाळू, समोर फेसाळणाऱ्या लाटा, आणि आजूबाजूच्या झाडांवरून ऐकू येणारा सारस पक्ष्यांचा किलबिलाट जणू एक निसर्गसंगीत सुरू झालंय असं वाटतं.





इथेच ठरल्याप्रमाणे आमच्यातील पर्यटकांनी वॉटर स्पोर्ट्स चा आनंद लुटला. आमच्यातील जे वयाने तरुण होते त्यांनी साहसी वॉटर स्पोर्ट्सचा आनंद आणि थरार अनुभवला. आम्ही एका सेमी सबमरीनमध्ये बसून समुद्र तळाचे अद्भुत दृश्य पाहिले. जणू पाण्याखालील रंगपंचमीच आम्ही अनुभवात होतो. एक वेगळेच विश्व आमच्या डोळ्यासमोर होते. बोटीच्या काचेतून दिसू लागलं एक इंद्रधनुष्य. कोरल्सच्या विविध आकृती मेंदूच्या रेघांप्रमाणे, फुलांचं गालिचा वाटावा अशा रंगांमध्ये, विविध रंगी देखण्या माशांचे सुंदर थवेच्या थवे आमच्या समोरून पोहत जात होते हे सगळं एखाद्या कल्पनारम्य चित्रासारखं वाटत होतं.

या ठिकाणी पाणी इतकं पारदर्शक आहे की समुद्राच्या अगदी तळापर्यंत दिसू लागतं मग ते फक्त पाहणार पुरत नाही तर आपण त्या सौंदर्यात हरवून जातो.

दिवसाच्या शेवटी, किनाऱ्यावर बसून मी समुद्राकडे पाहत होतो. आता सूर्य कलतोय, निळ्या सागरावर आता सोनेरी रंगाची चादर पसरतेय. या सगळ्या वातावरणात माणूस स्वतःला विसरतो आणि निसर्गगाश एकरूप होतो. रॉस आयलंड आणि नॉर्थ बे ही दोन वेगवेगळी ठिकाणे आम्ही आज पाहिली होती. अंदमानच्या या दोन बेटांनी मला केवळ दृश्य देऊन थांबवलं नाही, तर मनात खोलवर घर करून राहावं असं काहीतरी दिलं. हा प्रवास एका नाजूक हळुवार स्मरणासारखा आहे न बोलता खूप काही सांगणारा.

(क्रमशः)






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा (ब)

**ज्योतिर्मय साहित्य**

अधर्माने वागुन स्वतःच्या आयुष्याचे वाटोळे करून घेऊ नका. संयत धीर धर्मरक्षण,स्वकुळाचा ऊद्धार,

अतिलोभापायी वारेमाप धनसंपत्ती गोळा करणे सत्कर्म न करणे दानधर्म नकरणे, आहे त्या धनद्रव्याचा वापर योग्य प्रकारे न करता धनसंपदा साठवून ठेवणे. अशा अवस्थेत घरावर दरोडा पडला तर सगळं धनसंपदा चोर चोरून नेतात व हा कफल्लक होतो.

अशा रितीने वाईट मार्गाने मिळवलेला पैसा संपून जातो व हा माणूस रोगाचे भांण्डार बनतो. संपूर्ण शरीरात रोग पसरतो. केलेल्या पापाची फळे भोगण्याची वेळ येते.तारूण्यातील ऊन्माद संपतो शरीरभर किडे पडतात. कळाहीन देह,हातपाय झडलेले, शरीरात कंप भरलेला.अक्षरशः त्याच्या आसपास पण माणसे थांबत नाहीत सगळा किळसवाणा प्रकार पाहून याची अवस्था ना इहलोकी ना परलोकी अशी झाली. वाईट कर्माचे फळ असे मिळते.पुढच्या ओव्या मध्ये (२२ ते ४६) या ओव्या मध्ये रोगातून बरे होणे मुल होण्यासाठी नवस

सायास करणे थोडक्यात अंधश्रद्धा मनामध्ये ठेऊन करणी, गोसावी, बैरागी, चेटकाचे प्रयोगहीन मंत्रप्रयोग


करणे असे समाज विघातक कर्म त्याच्या कडून होते.

संपूर्ण समासाचा सार विचारात घेता अधर्माने वागू नका नितीधर्माचे पालन करा भगवंताशी एकरुप व्हायला विसरू नका. असेच समर्थ सांगतात.

सद्गुणांचा अवलंब करून देहाचे सोने करावे. भगवंताची ऊपासना करावी. हे या निमित्ताने सांगणे.

श्री राम जय राम जय जय राम।।

## संतांचे ग्रंथ



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

**ज्योतिर्मय साहित्य**

संतांचे ज्ञानच असे असते की, त्यांना वेदांताचे मर्म आपोआप कळते. अमुक एक ग्रंथ कुणी लिहिला, केव्हा लिहिला, त्यामध्ये अमक्या पानावर काय आहे, या गोष्टी एक वेळ संतांना सांगता येणार नाहीत, पण त्या विषयाचे मर्म त्यांना बरोबर ठाऊक असते. आपण पोथीतले नुसते शब्द तेवढे वाचतो; त्यांचा अर्थ संतांच्या कृपेवाचून कळणे कठीण आहे. बापाचा निरोप लहान मूल आईला आपल्या बोबड्या शब्दांत आणि स्वतःला कळला असेल तसा सांगत असते, तितपतच पोथीतल्या शब्दांचा अर्थ आज आपल्याला सांगता येईल. संतांनी ग्रंथ लिहिले याचे कारण, ज्यांना बुद्धीने खात्री करून घ्यायची आहे त्यांनी ती करून घ्यावी आणि परमार्थ करावा. संतांच्या वचनाचा ओढूनताणून अर्थ करू नये, त्याचा सरळ अर्थ घ्यावा. ग्रंथ वाचीत असताना आपली मते बाजूला ठेवावीत; एका अक्षरावर दुसरे अक्षर लिहिले, तर पहिले दिसत नाही आणि समजत नाही, म्हणून शुद्ध मनाने ग्रंथ वाचावा. आपल्या वडिलांचे पत्र जर आपल्याला आले तर आपण त्यातले अक्षर अन् अक्षर वाचतो. तसे, ज्ञानेश्वरी, दासबोध हे ग्रंथ अगदी मनापासून वाचावेत. पुष्कळ लोक जे पोथी ऐकायला जातात ते लोकांनी बरे म्हणावे यासाठी, किंवा करमत नाही यासाठी, किंवा इतर उद्योग नाही म्हणून जातात. असे करणे योग्य नाही. खरे म्हणजे, संतांचे ग्रंथ वाचून स्वतःला काय करायला पाहिजे ते शोधून काढून तेवढे करणारे लोक थोडेच असतात. ते ग्रंथ वाचून त्यांचा अर्थ नीट समजणारे लोक त्यापेक्षा जास्त असतात; 'मोठ्या संताचा ग्रंथ आहे' म्हणून नुसता वाचणारे लोक त्याहून जास्त असतात; आणि त्याहीपेक्षा, ते ग्रंथ मुळीच न वाचणारे लोक फारच जास्त असतात !

जगाच्या प्रवाहाच्या उलट जायला संतांजवळ शिकायचे असते. संतांना व्यवहारापुरतीच देहाची स्मृती असते. ते देहाला सावलीप्रमाणे मानतात. सावलीला दुःख झाले म्हणणे केव्हाही अयोग्यच. म्हणूनच संतांच्या मनावर सुखदुःखाचा परिणाम होत नाही. संतांकडे लोक कितीतरी कष्ट करतात आणि ते लोक यांच्या नात्यागोत्याचेही नसतात. संत त्यांना काही देत नसताना ते इतके कष्ट करतात, याचे कारण संतांचा त्यांच्याविषयी असणारा खरा आपलेपणा होय. संत एकांतात जातात याचे कारण असे की, लोकांतात त्यांना भेटणारे निराळे असतात आणि एकांतात भेटणारे निराळे असतात. लोकांतात संतांची शांती बिघडते असे मुळीच नाही; पण एकांतात भेटणाऱ्यांना लोकांतात भेटता येत नाही, म्हणून ते एकांतात जातात.


कोणत्याही संताचा ग्रंथ वाचताना, तो कृतीत आणण्याकरिता आहे, ही भावना ठेवून वाचावा.

## ।। संत - महात्म्य ।।

**संकलन : मधुकर बोरीकर**
**9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)**

## संत श्रेष्ठ श्री तुलसीदासजी

**ज्योतिर्मय साहित्य**



साहित्यिक दृष्टीने जरी विचार केला तरी तुलसीदासजींच्या रचनेमध्ये कोणताही दोष काढणे हे सोपे काम नाही. श्री राम चरित्र मानस याची प्रसिद्धी संपूर्ण जगतात वाढायला लागली हे पाहून काशीच्या पंडितांना मनात ईर्षा उत्पन्न झाली. ते जमेल तेवढा त्यास विरोध आणि निंदा करण्याच्या प्रयत्नाला लागले. एकदा त्यांनी दोन विख्यात चोरांना रामचरीत मानस हा लिखित ग्रंथ चोरून आणण्यास सांगितले. जेव्हा हे चोर तुळशीदासजीच्या झोपडीत घुसण्यासाठी प्रयत्न करत होते, तेव्हा त्यांनी हे पाहिले की बाहेर दोन शूर युवक योद्धे हे झोपडीच्या रक्षणासाठी धनुष्य बाण घेऊन सज्ज आहेत. ते दिसायलाही सुंदर, मोहक होते. एक शाम वर्णाचा तर एक गौरवर्णाचा होता. या दोन युवकांना पाहून चोरांची बुद्धी शुद्ध झाली. त्यांच्या मनातील चोरी करण्याची वासना तात्काळ गळून पडली. आणि ते सरळ जाऊन तुळशीदासजींच्या चरणावर वीनम्र झाले. तुळशीदास यांना जेव्हा ही कळाले की आपल्यासाठी भगवंत रात्री पहारा देत आहेत तेव्हा त्यांना अपराधीपणाची जाणीव झाली.आपल्या झोपडीतील या वस्तूंचा मोह आपणास नडतो आहे.त्यासाठी प्रभुस आपल्या वस्तू राखण्यास साठी बाहेर पहारा द्यावा लागावा ही किती शरमेची गोष्ट आहे.सेवकाने स्वामीची सेवा करावी तर इथे आपल्या मोहापोटी हे उलटेच घडले.मी किती मोठा पापी आहे असे विचार त्यांच्या मनी येऊ लागले. त्यांनी आपली घरातील सर्व संपत्ती दान देऊन टाकली आणि तोडरमल नावाच्या मित्रास राम चरित मानस हे पुस्तक त्यांनी सांभाळण्यासाठी दिले. हा तोडर्मल अकबर बादशहाच्या पदरी नवरत्न पैकी एक होता.

तुलसीदास यांनी हा ग्रंथ त्याच्याकडे सुपूर्त केला तरी, त्यांची प्रतिभा आणि विलक्षण स्मरणशक्तीच्या जोरावर संपूर्ण ग्रंथ अगदी तसाच त्यांनी पुन्हा लिहून काढला आणि नंतर त्याच्या अनेक प्रति सुद्धा तयार केल्या. तुलसीदासजी काशीच्या तुलसी घाटावर रहात. त्यांच्या कडून राम कथा ऐकण्यासाठी अलोट गर्दी जमा होई. एके दिवशी कलियुग, मनुष्य रूप धारण करून तुलसीदासजी यांच्याकडे आले व त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. त्याच क्षणी तुलसीदास यांनी हनुमंतरायाचे ध्यान केले.तत्क्षणी हनुमंत राय साक्षात प्रकट झाले. त्यांनी कलियुगापासून होणारी पीडा लगेच नष्ट केली. आणि त्यांनी सांगितले की तुम्ही प्रार्थना पर पद्यरचना करा. यानंतर तुळशीदासजीने त्यांची अंतिम कृती विनय पत्रिका ही लिहिली. आणि ही विनय पत्रिका त्यांनी भगवान श्रीरामांच्या चरणावर समर्पित केली. प्रभू श्रीरामांनी त्यावर स्वतःचे हस्ताक्षर करून तुलसीदास यांना त्यांच्या स्विकृतीची जणू पुष्ठी केली.

त्यांनी आपणा सर्वांना एक प्रयोग दिला ''सिया राम सरूप सब जग जानी करहू प्रणाम जुग जोड पानी

या जगतातील सर्व स्त्री शक्तीला माता सीता व सर्व पुरुषांना प्रभू श्री राम समजून विनम्र भावाने हात जोडून नमस्कार करा.

प्रेम आटलेल्या जा जगात प्रेम वृद्धीसाठी वरील प्रयोग सतत गिरवायला हवा. हा प्रयोग या संत श्रेष्ठी निश्चितच काटेकोरपणे गिरवायला होता म्हणूनच तो आपणास तो दिला आहे.

संवत १६८० श्रावण शुक्ल सप्तमी या दिवशी राम राम असे म्हणत तुलसीदासजी यांनी आपला ११२ वर्षाचा प्रदीर्घ जीवन काल संपवीत या शरीराचा त्याग केलां

भगवत भक्तीचे मळे सर्वत्र फुलविणाऱ्या या महान संतास विनम्रतेने प्रणाम करून हा भाग इथे संपवूयात श्रीराम जय राम जय जय राम/ श्रीराम जय राम जय जय राम//

***



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**श्रोत्रं श्रुतेनैव न कुण्डलेन**
**दानेन पाणिर्न तु कङ्कणेन।**
**विभाति कायः करुणापराणां**
**परोपकारैर्न तु चन्दनेन ।।**

अर्थ - ज्यांच्या मनात सदैव करुणेचा भाव आहे, त्या महान लोकांचे कान कुण्डलांनी नव्हे, तर शास्त्रश्रवणाने शोभून दिसतात. त्यांचे हात कंकणाने नव्हे, तर दान करण्याने अलंकृत होतात. तसेच त्यांचे शरीर चंदनाच्या लेपनाने नव्हे, तर परोपकाराने शोभून दिसते.

कुण्डले, कंकण, चंदनलेपन ही भौतिक देहाची आभूषणे असतीलही; पण शास्त्रश्रवण, दान आणि परोपकार ही खरी श्रेष्ठ आभूषणे आहेत. आणि या श्रेष्ठ आभूषणांमुळेच माणसाला चिरकाल टिकणारा असा गौरव प्राप्त होत असतो. असे कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी या श्लोकातून सुचविले आहे.




**ज्योतिर्मय साहित्य**

लीला हा शब्द सहजता या प्रमाणेही असतो रेड्यास बोल म्हणाले की तो वेद बोलला. हे सहजतेने घडले.

अनुभाव चरित्राचा आचरणातून आपणास आनंद मिळतो.भागवतात कृष्णाचे चरित्र हे बहुतांश लीला चरित्र आहे, तर राम चरित्र हे, बहुतांश अनुभाव चरित्र आहे.. आम्हाला गोवर्धन पर्वत उचलता येणार नाही पण एखाद्याला छत्री तर देऊन मदत करता येईल ! हा लीला चरित्रातील अनुभावाचा संदर्भ घेण्या सारखे होईल. म्हणजे आचरण करावे असा भाग असेल.

**कथा ऐकता ऐकता धावते संकलन**
**मधुकर बोरीकर, 9403061886**

वाल्मिकिनी चमत्कृती ला रामायणात स्थान दिले नाही. म्हणून हे अनुभाव चरित्र आहे.इतर रामायणात लीला देखील आल्या आहेत. वाल्मिकिनी नारदाना असा कोणता देव सांप्रत काळी आहे? हा प्रश्न विचारला नाही तर, असा कोणता नर आहे ?असे ते विचारतात.त्यामुळे आपणास वाल्मीक रामायण अधिक जवळचे वाटते. आपण कसे वागावे? हे कळावे म्हणून संत तसे जगून दाखवितात.म्हणुन संतांचे चरित्र हे अनुभावीक असते. रामचंद्र प्रभूचे चरित्र हे अनुभाव चरित्र म्हणून घ्यावे.

वाल्मिकिनी कुश लव यांना अयोध्येत जाऊन रामायण गायन करा असे सांगितले. ते कोणत्या राग दारीत करा हे सांगितले. तेंव्हा सर्वांना संस्कृत कळायचे,रामायण श्लोक रूपात संस्कृत मधूनच श्लोक रुपात असल्यामुळे त्यानी ते गायले.

(क्रमशः)




## शीतपित्त म्हणजे काय व अंगावर पित्त उठणे

**ज्योतिर्मय साहित्य**

थंड वातावरण, थंड पदार्थ यामुळे अंगावर पित्त उठू शकते.

सूर्यप्रकाश, उष्ण वातावरण, उष्ण पदार्थ यांची ऍलर्जी असल्यास त्यामुळेही अंगावर पित्त येते.

धूळ, धूर, हवेतील प्रदूषण, परागकण, केमिकल्स यांच्या संपर्कात आल्यामुळे, टेरेलीन, टेरीकाट अशा कपडांची ऍलर्जी असल्यास शितपित्त होऊ शकते.

तसेच पोटामध्ये कृमी व जंत झाल्याने, कीटक चावल्याने किंवा सर्दीसारखे इन्फेक्शन झाल्यामुळेही अंगावर पित्त उठू शकते. शीतपित्ताची लक्षणे -अंगावर खाज येणे, अंगावर पित्त उठणे, त्वचेवर सूज असणाऱ्या लालसर गांधी किंवा चकते उठणे अशी लक्षणे शीतपित्तामध्ये असतात.

या त्रासात आलेल्या पिताच्या गांधी व अंगाला होणारी खाज काहीवेळात आपोआप कमी होत असतात. मात्र पुन्हा ऍलर्जी असणाऱ्या पदार्थाच्या संपर्कात आल्यास पुन्हा अंगावर खाज सुटते व त्वचेवर पित्त उठते.

शीतपित्त किंवा अंगावर पित्त येणे हा त्रास एखाद्या पदार्थाच्या ऍलर्जीमुळे होत असतो. त्यामुळे नेमक्या ऍलर्जीचा ट्रिगर ओळखून त्यापासून दूर राहिल्यास हा त्रास दूर होत असतो. म्हणजे जर एखाद्यास शेंगदाणे खाल्ल्यानंतर असा त्रास होत असल्यास, त्याने शेंगदाणे खाणे बंद केल्यास हा त्रास होणे थांबते. यासाठी नेमकी कशाची ऍलर्जी आहे ते ओळखणे शीतपित्तामध्ये आवश्यक असते.

यासाठी तुम्ही एक लिस्ट बनवू शकता. त्यामध्ये तुम्ही रोज घेत असलेल्या सर्व प्रकारच्या खाद्यपदार्थांची नावे लिस्टमध्ये लिहा. त्यानंतर कोणता पदार्थ खाल्यावर त्रास होतो हे


संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९


आपल्या निरीक्षणातून ओळखणे सोपे जाईल. खाद्यपदार्थांची ऍलर्जी नसल्यास ऊन, उष्ण किंवा थंड वातावरण, कपडे, घरातील पाळीव प्राणी यापैकी कशाची ऍलर्जी आहे ते ही निरीक्षणातून ओळखू शकता.

काही जणांना हा त्रास अनेक महिने ते अनेक वर्षेही होऊ शकतो. अनेकजण शीतपित्त उपचारासाठी अँटी-हिसटामीन औषधे घेतात. अशा औषधामुळे खाज तात्पुरती कमी होते मात्र पुन्हा शीतपित्ताचा त्रास उदभवतो. बहुतांशी लोक अंगावर गांधी उठून खाज सुरू झाली की सेट्रीझिन किंवा अशा गोळ्या घेतात. याने खाज थांबते आणि तात्पुरते बरे वाटते; पण या औषधांचे दीर्घकालीन दुष्परिणामही अधिक आहेत. कारण या औषधांच्या अधिक सेवनामुळे शरीरातील सर्व स्राव अचानक शोषल्यासारखे होतात. तोंड, घसा कोरडा पडतो. झोप जास्त लागते. किडनीचे आजार उदभवतात म्हणून या आजारावर अशा गोळ्या घेऊन तात्पुरता उपचार करण्याऐवजी याला मुळापासून बरे केले पाहिजे.

***

## रवींद्रनाथ टागोर






विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

यानंतर १९१० मध्ये त्यांनी गोरा ही कादंबरी लिहिली. गोरा ही रवींद्रनाथांची पाचवी कादंबरी आहे. या कादंबरीत राजकीय, सामाजिक, धार्मिक, जातीय अशा विविध विषयांवर रवींद्रनाथांनी कथेच्या माध्यमातून प्रतिकात्मक भाष्य केलेले आढळते. या कादंबरीतील जवळपास सर्वच पात्रे प्रतीकात्मक आहेत. तरीही त्यांच्यामध्ये एक प्रकारचा जिवंतपणा भरलेला आहे. ही कादंबरी म्हणजे व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि धर्म यांच्या यांचे स्वरूप कसे असावे त्याचा एक आराखडा आहे. या कादंबरीला एक आधुनिक महाकाव्य म्हटले तरी चालेल एवढी तिची व्याप्ती मोठी आहे. गौरमोहन उर्फ गोरा हा या कादंबरीचा नायक आहे. गोरा हा एका आयरिश दाम्पत्याचा मुलगा आहे. गोरा ची आई त्याला युद्धकाळा दरम्यान जन्म देते आणि नंतर तिचा मृत्यू होतो. त्यानंतर कृष्णदयाळ आणि आनंदमयी हे बंगाली दांपत्य त्याला मुलाप्रमाणे वाढवते आणि त्याचा सांभाळ करते. विनय हा त्याचा जिव्हाळ्याचा मित्र आहे. कृष्णदयाळ आणि आनंदमयी यांच्या शेजारी एक ब्राम्हो समाजाचे अनुयायी असलेले दांपत्य राहत असते. त्यांचे नाव परेशबाबू आणि वरदासुंदरी असे असते. या दांपत्याला लावण्या, ललिता आणि लता तीन मुली असतात. सुधीर नावाचा एक मुलगा असतो. याच कुटुंबामध्ये परेश बाबू यांच्या एका स्वर्गवासी मित्राची मुलगी सुचरिता आणि तिचा सख्खा भाऊ सतीश हे सुद्धा राहत असतात. या कुटुंबाशी विनय आणि गोरा यांचा परिचय होतो. विनय आणि गोरा यांच्या वैचारिक अधिष्ठानामुळे ललिता आणि सुचरिता त्यांच्याकडे आकर्षित होतात. त्याचप्रमाणे या कथेमध्ये हरीमोहिनी, पानुबाबू, शशिमुखी ही पात्रे देखील कथेच्या आवश्यकतेनुसार येतात. ही कथा रवींद्रनाथांनी अतिशय रंजक पद्धतीने सादर केली आहे. ती वाचकांना खिळवून ठेवते.



## जात्यावरच्या ओव्या......

---

नातेसंबंध : नणंद-भावजय

*किती वाट पाहू*
*झाडीतून माडीतून*
*दादा महा उतरला*
*भर बाराच्या गाडीतून ||४८||*

*आंब्याचा आमरस*
*झाला गोड गुळा वाणी*
*केळ्याची घेते फनी*
*दादा बोलवते दोन्ही ||४९||*

---

*संदर्भ- शांताई इंगळे*
*संकलन- सौ. मनोरमा बोराडे*
*सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर*

# बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे. दोन वर्षापूर्वी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. जम्मू काश्मीर सारख्या निसर्गाच्या नंदनवनात काल निसर्गाने काल जो प्रकोप दाखवला तो पाहून सगळ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला. जम्मू काश्मीरमध्ये ढगफुटी झाली. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमध्ये हाहाकार उडाला. क्षणात संपूर्ण प्रदेश जलमय झाला. प्रचंड पाऊस आणि भूस्खलन झाल्याने तीन जनांना आपला जीव गमवावा लागला. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमधील जनजीवन विस्कळित झाले. शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे लागले. तिथे अजूनही बचावकार्य चालू आहे. ऐन उन्हाळ्यात निसर्गाने दाखवलेल्या या उग्र रूपाने सर्वजण आवाक झाले. जम्मू काश्मीरमध्ये अशा प्रकारचा पाऊस यापूर्वी पाहिला नव्हता असे तेथील जुने जाणते लोक सांगत आहेत. केवळ जम्मू काश्मीरच नाही तर देशातील अनेक राज्यात अशाप्रकारचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ईशान्य आणि दक्षिणेकडील काही राज्यात विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेशात २२ ते २४ तारखे दरम्यान अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, आणि छत्तीसगड मध्ये २० ते २४ दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे केरळ, कर्नाटक, लक्षद्वीप, आंध्रप्रदेश, तेलंगणा या दक्षिणेकडील राज्यातही पावसाची शक्यता वर्तवली आहे. म्हणजेच देशातील एका भागात कडाक्याचे उन तर दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस अशी विषम परिस्थिती आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ या घटना आताच घडतात असे नाही तर वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. कॉंक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# बालकुमारांचा सखा : पवनपुत्र हनुमान

ज्योतिर्मय साहित्य


कादंबरी, विनोदी कथासंग्रह, बालकथा, प्रवासवर्णन, चरित्रग्रंथ इत्यादी विविध साहित्य प्रकारांमध्ये मुशाफिरी करणारे आणि मराठी साहित्यक्षेत्रात एक नामवंत लेखक म्हणून सर्वांना परिचित असलेले श्री नागेश शेवाळकर यांचे ''पवनपुत्र हनुमान'' हे चरित्रात्मक पुस्तक अलीकडेच म्हणजे श्री हनुमान जन्मोत्सवाच्या दिवशी बारा एप्रिल रोजी प्रकाशित झालेले आहे.

लाडोबा प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेले हे पुस्तक म्हणजे संस्कारक्षम वयातील मुलांसाठी जणू हा हनुमानाचा प्रसादच आहे. या पुस्तकाचे अत्यंत आकर्षक मुखपृष्ठ तसेच आतील चित्र संकल्पना ज्योती घनश्याम यांच्या आहेत. पुस्तकाची मांडणी मयुरी मालुसरे यांची आहे.

सुंदर छपाई आणि आकर्षक रंगातली चित्रे हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल..

आजच्या काळात बालमित्रांपुढे हॅरी पॉटर आणि इतर विदेशी कथानायकांच्या गोष्टी ठेवल्या जात असतांना ''पवनपुत्र हनुमान'' या पुस्तकाच्या रूपाने बलोपासना करण्याची उर्मी देणाऱ्या वीर हनुमानाच्या गोष्टी बालमित्रांना वाचायला मिळणे ही सर्वार्थाने महत्त्वाची आणि आनंदाची बाब आहे.

या पुस्तकाची प्रस्तावना आणि मलपृष्ठावरील पाठराखण लाडोबा प्रकाशनचे धडाडीचे प्रकाशक घनश्याम पाटील यांची आहे. प्रस्तावनेत त्यांनी आपले मनोबल उंचावणारे,




आपल्याला प्रेरणा देणारे, हनुमानाप्रमाणेच आपल्या शक्तीचा विसर पडल्यास ती जागृत करणारे असे साहित्य काळाच्या ओघात कायम टिकून राहील असा आत्मविश्वास प्रगट केला आहे.

लेखकाने आपल्या मनोगतात,

मी काय लिहिली कथा
करता करविता तोचि भला
मी निमित्तमात्र जाहलो
त्यानेच लिहून घेतले

असे सांगून या पुस्तकाची निर्मिती म्हणजे भगवंताचीच कृपा असल्याचे नम्रपणे नमूद केले आहे.

''पवनपुत्र हनुमान'' या पुस्तकात एकुण ४३ कथा असून पहिल्याच कथेमध्ये बाल हनुमानाचे सूर्याकडे झेप घेणाऱ्या प्रसंगाचे सुंदर वर्णन केले आहे. सूर्याकडे वायुवेगाने जाणाऱ्या बालकाला राहू आणि केतू अडवू शकले नाहीत म्हणून ते दोघे थेट इंद्रदेवाकडे गेले. त्यानंतर इंद्रदेवाशी हनुमानाचे युद्ध झाले. परंतु शेवटी इंद्रदेवाना क्षमा मागावी लागली. ही कथा मुळातूनच वाचायला हवी.



पुस्तक परीक्षण

उद्धव भयवाळ,
छत्रपती संभाजीनगर

द्रोणागिरी पर्वताला उचलले'' या कथेत लक्ष्मणाची शुद्ध हरवल्याची सर्व माहिती देऊन हनुमानाने संजीवनी बुटी देण्याची विनंती द्रोणागिरी पर्वताला केली आणि सूर्योदयापूर्वी संजीवनी घेऊन जाणे कसे आवश्यक आहे, हे सांगितले. परंतु द्रोणागिरी पर्वताने त्याच्याशी उर्मटपणे बोलून ''मी तुला किंवा रामाला किंवा लक्ष्मणाला कुणालाही ओळखत नाही'' असे म्हणून हनुमानाला हाकलून लावण्याचा प्रयत्न केला. द्रोणागिरी पर्वताचे हे उर्मट बोलणे ऐकून हनुमानाला खूप राग आला आणि त्याने तत्काळ आपल्या शेपटीने तो बलाढ्य द्रोणागिरी पर्वत करकचून बांधला आणि एका हातावर तो पर्वत उचलून थेट लंकेकडे प्रयाण केले.

रावण दरबारी हनुमंताची भरारी, किष्किंधा पर्वतावर श्रीरामाची भेट, पराक्रमी, धाडसी, साहसी हनुमान,

राम-रावण युद्ध, हनुमानाच्या हृदयी श्रीराम, सीतेचा पाहुणचार या आणि इतर सर्वच कथा रंजक, बोधप्रद आणि हनुमानाच्या साहसाची ओळख करून देणाऱ्या आहेत. त्यामुळे या सर्वच कथा बालकुमारांना खूप आवडतील यात शंका नाही.

थोडक्यात ''पवनपुत्र हनुमान'' हे पुस्तक बालकुमारांचा सखा आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

श्री नागेश शेवाळकर यांना पुढील लेखनप्रवासासाठी मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि थांबतो.

-पुस्तक परिचय: पवनपुत्र हनुमान (चरित्र)
लेखक नागेश सू.शेवाळकर
प्रकाशक- लाडोबा प्रकाशन, पुणे
पृष्ठे ६४, मूल्य २५० रुपये

## दवा-खाना

# तुमसे कोई अच्छा है ना तुमसे कोई प्यारा


ज्योतिर्मय साहित्य

नमस्कार मैत्रांनो!

माझ्याच 'फार्माकॉलॉजी' विषयाकरता आजचे शीर्षक राखीव आहे. त्याची मी यासाठी तारीफ करते की हा विषय हा विषय फॅशनसारखा अनवरत बदलत असतो. बदल हाच या विषयाचा मला प्रिय असा स्थायीभाव आहे! म्हणूनच या चिरतरुण विषयाचे गमक ज्या मेडिकलच्या विद्यार्थ्याला गावले तो या विषयात तरला, अन्यथा...दुसरे काय? गटांगळ्या खात खात पोहायला शिकणे अनिवार्यच, कारण औषधे प्रत्येक वैद्यकीय विषयात विक्रमाच्या मानगुटीला बसलेल्या वेताळासारखी हजर असतातच! पेडानिअस डायोस्कोराइड्स (जन्म इ.स. ४०, ॲनाझार्बस, सिलिशियामृत्यू इ.स.९०) हे एक ग्रीक चिकित्सक आणि औषधशास्त्रज्ञ होते. त्यांनी प्रथम मटेरिया मेडिका हे आधुनिक वनस्पतिशास्त्राच्या शब्दावलीचे अग्रगण्य शास्त्रीय स्त्रोत तयार केले. नंतरच्या १६ शतके हाच ग्रंथ प्रमाण होता. आधुनिक औषधशास्त्राची मुळे याच पारंपरिक स्त्रोतातून उपजली.

सुरुवातीला मटेरिया मेडिका या औषधांच्या रासायनिक गुणधर्म आणि गुणवत्तेबाबत जुजुबी शिक्षण देणाऱ्या शाखेचे 'फार्माकॉलॉजी' या स्वतंत्र विषयात रूपांतर झाले आहे. महत्वपूर्ण नवनवीन औषधांच्या क्रांतिकारक शोधांमुळे आणि त्यालाच पूरक अशा संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि माहितीच्या जाळ्यामुळे या विषयाचा आवाका खूपच विस्तारला आहे. येणाऱ्या १०० वर्षात औषधांच्या रूपात अद्भुतरम्य बदल होऊन जीन (जिन नव्हे) थेरपी अर्थात जनुकीय उपचार देण्याइतपत शास्त्रज्ञांनी प्रगती केलेली आहे. रोग्याच्या रोगास कारणीभूत असलेल्या जनुकांत बदल करीत त्याच्या शरीराच्या पेशींत निरोगी जनुकांचा अंतर्भाव करण्याचे आजच्या घडीला स्वप्नवत वाटणारे उद्दिष्ट भविष्यात साध्य झाले तर कित्येक रोगांवर मात करणे शक्य होईल.

आता परत वळते प्रतिजैविकांच्या प्रतिकूल परिणामांकडे! पेनिसिलिनची लोकप्रियता डागाळणाऱ्या ॲनाफिलेक्सिसने स्ट्रेप्टोमायसिनला देखील झपाटले होते. मात्र त्याचा प्रादुर्भाव बराच कमी होता. त्याची भरपाई स्ट्रेप्टोमायसिनच्या इतर साईड इफेक्टने केली. यासोबतच १९७० च्या दशकापर्यंत स्ट्रेप्टोमायसिन इंजेक्शन हे टी बी च्या रुग्णांकरिता अतिशय महत्वाचे औषध होते. मात्र ते इतर इन्फेक्शनकरता वापरले जात असल्याने






टीबीच्या जिवाणूंवर त्याचा प्रभाव कमी पडत चालला होता.

१९७० च्या सुमारास सल्फोनामाईड या औषधाबरोबर एक प्रतिजैविक जोडून एक औषध संयोजन करण्यात आले. कोट्रिमॉक्सझोल (याचा मार्केटमधील पहिला ब्रॅंड 'सेप्ट्रान' मूत्रमार्गात जीवाणूजन्य संक्रमणाच्या उपचार आणि प्रतिबंध यासाठी अतिशय प्रसिद्ध झाला, कारण त्याचे प्रभावी कार्य आणि तोंडावाटे घेण्याची सुविधा). मंडळी, गडचिरोलीसारख्या अतिदुर्गम भागात आपल्या 'सर्च' नावाच्या वैद्यकीय सेवाभावी संस्थेद्वारे जगप्रसिद्ध झालेले डॉक्टर युगुल अभय आणि राणी बंग यांनी या भागात न्यूमोनियासारख्या तेथील बालमृत्यूला कारणीभूत असलेल्या रोगावर याच औषधाद्वारे अतिशय प्रभावीरित्या मात केली. त्यांच्या या उपचारपद्धतीवरचे संशोधन लॅन्सेट या जगप्रसिद्ध मेडिकल नियतकालिकात प्रसिद्ध झाले. मात्र आश्चर्य म्हणजे शहरी भागात तोवर या औषधाची जादू ओसरली होती. हे असे कां झाले, तर औषधाचा बेसुमार वापर झाल्यास ते जिवाणूंवर प्रभाव टाकेनासे होते. याचाच अर्थ एका क्षेत्रात त्याच्या अतिवापरामुळे प्रभावहीन असलेले तेच औषध जिथे त्याचा फारसा वावर नाही अशा अन्य क्षेत्रात प्रभावी ठरू शकते. याच कोट्रिमॉक्सझोलच्या प्रतिकूल परिणामांत त्वचेवर ॲलर्जी आणि क्वचित ॲनिमिया (रक्तक्षय) यांचा समावेश आहे. गर्भवती महिलांमध्ये याचा वापर टाळता आला तर बरे. मात्र आपल्याला हे वाचून आश्चर्य वाटेल की बाजारात आल्यावर पाच सात वर्षात कुचकामी ठरलेल्या या औषधाचे नशीब अचानक पालटले. झाले असे की १९८० च्या दशकापासून एच आय व्ही एड्सचा प्रादुर्भाव वाढत्या प्रमाणात दिसून आला. अशा रुग्णांची प्रतिकारशक्ती नाहीशी होते आणि ते वेगवेगळ्या संक्रमणांनी ग्रस्त होतात. त्यात न्यूमोसिस्टिस न्यूमोनिया या फुफ्फुसांच्या रोगाचे प्रमाण बरेच जास्त असते. एच आय व्ही एड्सच्या रुग्णांना होणाऱ्या याच अतिघातक न्यूमोनियाकरता कोट्रिमॉक्सझोल सर्वाधिक प्रभावी असल्याचे दिसून आले. अशा रुग्णांसाठी ते जीवदान देणारे औषध ठरले आहे.

मंडळी, प्रत्येक जुने प्रतिजैविक टाकाऊ नसते. कधी कधी त्यापैकीच एखादे नव्याने प्रादुर्भाव झालेल्या संक्रमणाकरता प्रभावी ठरू शकते. याच विषयावर अधिक चर्चा पुढील भागात!




लेखिका
डॉक्टर मीना श्रीवास्तव

# एक थोर स्वातंत्र्यसेनानी–रावसाहेब पटवर्धन

ज्योतिर्मय साहित्य

१९३७ साली मुंबईला भरलेल्या पुरोगामी लेखक परिषदेचे ते अध्यक्ष होते. केसरीतून त्यांचे प्रसिद्ध झालेले अनेक लेख हे त्यांच्या चिकित्सक विचारवंत वृत्तीचे द्योतक मानावे लागतील. वैयक्तिक सत्याग्रहासाठी महात्मा गांधीजींनी रावसाहेब पटवर्धन यांची निवड केल्यामुळे त्यांना अटक झाली व साहजिकच १९४२ च्या क्रांती लढ्यात अच्युतराव पटवर्धन यांनी जे भूमीगत राहून कार्य केले तसे रावसाहेब यांना करता आले नाही. स्वातंत्र्योत्तर काळांत अच्युतराव आणि रावसाहेब या दोघांनीही राजकारण संन्यास घेतल्याने पटवर्धन बंधूंच्या विविध गुणांना तरुण पिढी पारखी झाली हे दुर्दैव होय. रावसाहेबांचा पिंड विचारवंतांचा असल्याने ते जे कृष्णामूर्ति यांच्या विचारधारेकडे वळले. लोकशाही, समाजवाद, स्वातंत्र्य, समानता याचा पदोपदी स्वातंत्र्यानंतर जप होत राहिला तरी देशहिताची तळमळ, त्याग, समाजसेवा या गुणांची किंमत घसरून महत्त्वाकांक्षी व स्वार्थी मंडळी पुढे सरकू लागली. स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी तळहातावर शीर घेऊन, गळफासाची पर्वा न करता समाजाची व स्वातंत्र्याची सेवा बजावलिले बाजूला फेकले गेले. रावसाहेब व्यथित होऊन या गदारोळात स्वतःहूनच बाजूला झाले.भाषावार प्रांतरचनेला त्यांचा पाठींबा होता, तरी ज्या प्रकारें भाषावार राज्यांच्या चळवळी झाल्या ती पध्दत लोकशाहीच्या व कायद्याच्या मुळावर हे सांगण्यास ते कचरले नाहीत. त्याचप्रमाणे हा प्रश्न घटना तयार करतानाच हाताळण्यांत आला नाही म्हणून पंडीत नेहरू यांना आणि इतरांना दोष देण्यास ते घाबरले नाहीत. सीमाप्रश्नावर सेनापती बापट यांनी उपोषण आरंभल्यानंतर हा प्रकार दहशतीच्या स्वरूपाचा असल्याने राष्ट्रीय ऐक्य व लोकशाहीवर गंडांतर येईल असा इशारा त्यांनी दिला. रावसाहेब यांनी गुलाबांची मशागत हौसेने केली. पुणे रोझ सोसायटीच्या कार्यात आवडीने भाग घेत अच्युतराव आपटे यांनी स्थापन केलेल्या पुणे फ्रान्स मित्रमंडळ या संस्थेचे १९६६ ते १९६९ पर्यंत ते कार्याध्यक्ष होते.

लोकमान्य टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाचा झेंडा नगर शहरात आणि जिल्ह्यात आभिमानाने फडकावत ठेवणाऱ्या पटवर्धन कुटुंबीयांनी नंतरच्या काळात महात्मा गांधी आणि पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या विचाराबरोबर काम केले. नेहरू आणि रावसाहेब पटवर्धन एका तऱ्हेने समानधर्मी होते. व्यापक राजकीय, सामाजिक आणि धार्मिक विचारसरणीने दोघांना जवळ आणले होते. काँग्रेसशी दोघांचे घनिष्ट संबंध. कॉंग्रेसच्या फैजापूर अधिवेशनाचे नेहरू अध्यक्ष आणि रावसाहेब स्वयंसेवकाधिपती ! रावसाहेबांचे घराणे वडिलार्जित थिऑसॉफिस्टाचे, म्हणजे उदार धर्मवादाचे किंवा सर्वधर्म समभावाचे. नेहरु पाश्चात्य आणि पौर्वात्य संस्कृतीच्या समन्वयाने या



विचारसरणीला पोहोचलेले. दोघेही समाजवादाकडे बरेच झुकलेले. दोघांची बौध्दीक पातळी सारखीच. पटवर्धन बंधूंने महाराष्ट्राच्या श्रमजीवी समाजात भरपूर संचार केलेला. १९३० साली नगर जिल्ह्यातील संगमनेरच्या जंगल सत्याग्रहात पटवर्धनांच्या नगरमधील घराचा वरचा मजला युद्धमंडळाच्या बैठकी घेण्याचे एक गुप्त ठिकाण ठरलेले होते. स्वातंत्र्यसंग्राम चालू असता लोकशाही समाजवादी विचारसरणीची जी एक नवीन पिढी घडविली जात होती तिचे रावसाहेब, आणि अच्युतराव पटवर्धन प्रमुख घटक. आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे, भाऊसाहेब रानडे, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, मेहेर अल्ली इत्यादी समान धर्म तरुणांचे जणू एक वैचारिक कुटुंबच बनले होते.

पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे रावसाहेब पटवर्धन मित्र,पण रावसाहेबांनी राजकारण त्याग केला असल्याने त्यांचा उपयोग राष्ट्रकार्यात कोठेना कोठे तरी करून घ्यावा असे पंडीतजींना सारखे वाटत असे. आणि त्यानुसार त्यांनी रावसाहेबांना काही जागा देऊही केल्या होत्या. एकदा रावसाहेब पंडीतजींचे वैयक्तिक प्रतिनिधी म्हणून काश्मीरची पाहणी करून आले. एकदा डॉ.राधाकृष्ण यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या युनेस्को शिष्टमंडळाचे सदस्य या नात्याने ते पॅरिसला जाऊन आले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर इंग्लंड मधील भारताचे हायकमिशनर म्हणून रावसाहेब पटवर्धनांची नेमणूक करावी असे पंतप्रधान नेहरूंना वाटले. भारत नुकताच स्वतंत्र झाला होता आणि ब्रिटनमधील हायकमीशनर पदाचे महत्व त्या काळात अतीव होते. अशा जागी पंडीतजींना



शिरीष चिटणीस

आपल्या अत्यंत विश्वासातील व्यक्ती हवी होती. पण रावसाहेबांची अनासक्ति एवढी की, त्यांनी पंडीतजींना नकार कळविला. कोणताही पदाधिकार स्वीकारण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले. नकार कळविला त्या पत्रामध्ये त्यांची सारी सौजन्यशीलता साकार झालेली दिसते. पंडीतजींना लिहिलेल्या उत्तरांत रावसाहेब म्हणतात...‘‘आपल्या मित्रमंडळात एक तरी मित्र असा राहू दे की जो आपल्या कृपाछत्राखाली नाही !‘‘ निरिच्छ माणसें सहसा सौजन्यशील नसतात. पण या दोन्ही गुणांचा क्वचित आढळून येणारा संगम रावसाहेबांच्या ठायी होता. जवाहरलाल नेहरू पुण्यात आल्यावर रावसाहेबांची भेट घेतल्याशिवाय कधीही परत जात नसत. शेवटी शेवटी तर पंडीत नेहरूंनी रावसाहेब यांना भारताचे उपराष्ट्रपतीपद स्वीकारण्याची गळ घातली होती. पण रावसाहेबांनी या पदासाठी सुद्धा नम्रपणे नकार दिला. रावसाहेब पटवर्धनांचे २८ ऑगस्ट १९६९ रोजी अचानक निधन झाले. एका थोर स्वातंत्र्यसेनानी व्यक्तिमत्वास भारत मुकला.

(क्रमशः)




## मँगो डिझार्ट बाईट

आता उन्हाळा सुरु झाला . कैऱ्यांच्या बरोबरच आंबेही बाजारात येण्यास सुरुवात झाली. फळांचा राजाच तो, स्वागत सुद्धा सर्वजण तितक्याच प्रेमाने करतात. वर्षभर वाट पाहिल्यावर आलेला असतो ना,मग आल्यावर अगदी रसपासून ते आंबा आईस्क्रीम,कुल्फी, मस्तानी,साटे, मावा,वड्या तर बनवून हौसेने सारेजण खातातच,पण हौशी आणि मनापासून

याच्यावर प्रेम करणारे लोक नवनवीन पदार्थ शोधून बनवून खातात, पार्ट्या देतात. अगदी आमरस पुरणपोळी पार्ट्या तर होतातच, पण आंब्याचा भात, विविध डिझार्ट्स अगदी मनापासून बनवून मनसोक्त ताव मारतात. आज आपण थोडेसे मजेशीर डिझर्ट बनवायचे का? हे पाहून सारेच एकदा तरी नक्कीच करून पाहू म्हणणार आणि एकदा बनवल्यावर,टेस्ट केल्यावर सिझन संपेपर्यंत बनवणार,खाणार, सर्वांना उत्साहाने खिलवणार हे नक्की

साहित्य:

६ हापुसचे मोठ्या आकाराचे आंबे, १ लिटर दूध,१ चमचा मँगो कस्टर्ड पावडर, अर्धी वाटी साखर,१चमचा दुधमसाला, २ चमचे मिल्क पावडर, २ चमचे ड्राय फ्रुट्सचे पातळ काप.

कृती:

प्रथम पाव कप दूध बाजूला ठेवून बाकीचे दूध उकळण्यास गॅसवर ठेवावे. बाजूला ठेवलेल्या दुधात कस्टर्ड पावडर



मिक्स करून घ्यावी. आता त्यातच पाव कप पाणी घालून मिल्क पावडर पण व्यवस्थित मिक्स करावी. थोडे सैलसर असले म्हणजे गुठळ्या होत नाहीत. दूध चांगले उकळायला लागल्यावर ७..८ मिनिटे मध्यम आचेवर मधून मधून ढवळत आटवावे.




आता त्यात दूध मसाला, ड्राय फ्रुट्स घालून व्यवस्थीत ढवळावे. नंतर गॅस थोडासा बारीक करून त्यात कस्टर्ड पावडर,मिल्क पावडर मिक्स केलेले दूध त्यात सावकाशपणे घालावे. हे सतत ढवळत राहावे म्हणजे त्यात गुठळ्या होत नाहीत.आता हे एकदम झटपट आटून घट्ट होते.हे थंड होण्यास ठेवावे.

त्यानंतर आंबे स्वच्छ धुवून पुसून घ्यावेत. वरचे देठ व त्याच्या बाजुचा मोठ्ठा गोल भाग धारदार सुरीने कापावा. तो वर पुन्हा ठेवायचा आहे हे लक्षात ठेवून तो त्याच आंब्याजवळ ठेवावा. आता सुरीने आतील कोय गोल फिरवत अलगद काढून घ्यावी. आता आतून कोय गेल्यामुळे पोकळ जागा झाली असेल त्यात हे थंड झालेले आईस्क्रीम सारखे घट्ट झालेली रबडी घालावी व त्यावर सुरीने काढलेले देठासोबतचे झाकण ठेवावे.सर्व आंबे असे भरून झाले की ते फ्रीझर मध्ये सेट होण्यासाठी ठेवावेत. साधारण ७..८ तासात आतील रबडीचे मस्त आईस्क्रीम बनून सेट होते.मग ते बाहेर काढून आंबा बाहेरून एकदम कडक झालेला असेल. सालकाढणीने आंब्याची

साल काढावी व त्याच्या सुरीने चकत्या कट करून घ्याव्यात. आता आपले हे हटके डिझार्ट रेडी आहे. सर्व्हिंग बाऊल मध्ये काढून आवडत असेल तर त्यावर टुटीफ्रूटी, स्प्रिंकलर्स किंवा पिस्ते घालून थंडगार सर्व्ह करावे.

वैशिष्ट्य:

हे डिझार्ट दिसायलाच इतके आकर्षक आहे की आधी डोळ्यांनी मन तृप्त होते.आंबा, रबडी कुल्फीचे कॉम्बिनेशन तर इतके लाजवाब लागते की केलेल्या परिश्रमाची पुरेपूर सार्थक

झाल्याची फडशा पडताच जणू पावतीच मिळते

उन्हाळा नको रे बाबा म्हणणारे, आता उन्हाळा संपूच नये असे म्हणायला लागतील पहा !

***

### भगवान परशुरामाचा पाळणा

बाळा जो जो रे
भृगुकुलभूषणा
रेणुका नंदना/धृ/

अक्षय तृतीया तिथी थोर
धरणी आनंदली फार
देव मानव ऋषी आश्रमी
झालासे अवतार /१/

आशिर्वच वदनी तुज देई
माहुरगडी ची आई
निद्रा करी बाळा
माते च्या लडिवाळा /२

जन्मा आलासे मज पोटी
उधदरीले कुळ कोटी
आनंद होई मना
ये बाळा पायी शोभतो वाळा /३

भार्गव पराक्रमी
वीर गुणी विख्यात
परशू घेऊनी आला हाती
धेनु द्विज रक्षणाथ /४/

पाळणा जोजविते तुज आई
गाउनी गीत अंगाई
निद्रा करी बाळा
माते च्या वेल्हाळा /५/

– कवी द.दि. पळसकर
पुणे

### कविता

मी मनाचा ऐकला नाहीच सल्ला
त्यामुळे का तेच करते रोज कल्ला

जीवना व्यापार तोट्याचाच माझा
दु:ख विकुनी का तुझा भरणार गल्ला

नेहमी तू सोडतो मैदान हल्ली
मिरवतो पण सांग कसली ऐट मल्ला

जेवढे गाठीस होते पुण्य तेही खर्चले ते
पाप टपले मारण्याला नित्य डल्ला

तू मनाची सोड ‘सागर’ आज पर्वा
वाट खडतर वावुनीया तू गाठ पल्ला

प्रकाश क्षीरसागर,
गोवा

### छंद पुस्तकांचा...

पुन्हा जडु दे पुस्तकांचा छंद आता
ग्रंथवेडा होऊनी जा धुंद आता...
मित्र ही गुरू पुस्तकाचे रुप आहे
वसु दे मनी पुस्तकांचा गंध आता...
पुस्तके जे ज्ञान देती कामी येते
नेट वेड्या करमणुकी कर बंद आता...
विश्वभरात जे सत्य आहे विखुरलेले
ओंजळीत तो घे भरोनी मकरंद आता
कावटाळूनी घे छातीवरी ती पुस्तके
अन् वाचनाचा घे पुन्हा आनंद आता...

– बलराज संघई
९४२००१५१०८
छत्रपती संभाजीनगर




### पुस्तके

पुस्तके म्हणजे ज्ञानाचे भांडार
दूर करतात अज्ञानाचा अंधार

पुस्तके आपल्याला खुणावतात
मैत्रीचा हात पुढे करतात

पुस्तके नेमकी असतात काय?
पुस्तके म्हणजे कामधेनू गाय

कधी हसविती, कधी रडविती
पुस्तके आपले जीवन व्यापती

पाहावी पुस्तके, वाचावी पुस्तके
प्रेमभराने कुरवाळावी पुस्तके

पुस्तके आपणास लाविती लळा
पुस्तके म्हणजे आनंदाचा सोहळा

– उद्धव भयवाळ
छ. संभाजीनगर
मोबाईल: ८८८८९२५४८८

### मी अवनी

परिक्रमा मी रवीची अविरत करिते,
म्हणोनी तुज सोहळे ऋतूंचे दिसते!
दृष्टता अन् कुकर्माचे ओझे झेलून ही,
सृष्टी सौंदर्य लेवून मी नव्यानं सजते .
नकोस घेऊ फार कष्ट मज साठी,
पण प्रतीवरीस एक वृक्ष तू लाव रे !
अस्तित्व तुझे माझ्यावर अन् मज ,
झाडं गरजेचे जसे तुला श्वास रे!
नदी माय होऊनी आली तुजसाठी ,
तिज दुषित केले तू रंग रूपा सहित.
सुंदर निसर्ग तुज दिला जगण्यासाठी,
त्यास जपण्यात आहे तुझेच हीत !
सांभाळते मी तुला तू सांभाळावे मला!
प्रेमानं अन् मायेनं ,करते ही विनवणी
अवलंबून एकमेकांवर आपण जाण रे,
मानवा तुझ्यासाठी च आहे, मी अवनी!

– सौ. प्रियंका गौरव जावळे.
छत्रपती संभाजीनगर.
प्रियागौरव

### वाचाल तर.....

वाचाल तर व्यक्तिमत्त्व उंचवाल ।
नाही तर आयुष्य बकाल कराल ।।

वाचाल तर मनाने श्रीमंत व्हाल ।
नाही तर मनात अहंकार वाढेल ।।

वाचाल तर नेमकं स्पष्ट बोलाल ।
नाही तर फाफटपसारा पसराल ।।

वाचाल तर क्षमाशील व्हाल ।
न वाचाल तर वासनाधिन व्हाल ।।

वाचाल तर आत्मबल वाढवाल ।
नाही तर मनाने कमकुवत व्हाल ।।

वाचाल तर जगण्याची प्रेरणा मिळेल ।
नाही तर सफशेल नापास व्हाल ।।

वाचाल तर शब्दांशी मैत्री वाढेल ।
नाही तर मैत्रीची पाटी कोरी राहील ।।

वाचाल तर सर्वार्थाने सक्षम व्हाल ।
वाचाल तर जीवन समृध्द होईल।।

वाचाल तर संघर्षाची प्रेरणा मिळेल ।।
वाचाल तर ख–या प्रेमाची भाषा कळेल ।।

– दत्ता तरलगट्टी
पंढरपूर, ९८८१६२९०४८

### पहेलगाम हल्ला

धर्म विचारत सांडले त्यांनी माणसांचे रक्त
एवढे आहे का सनातनी हिंदूंचे जगणे स्वस्त
पत्नी समक्ष गोळी घालून हत्या झाली पतीची
साक्षीदार या क्षणाची म्हणत सुटका पत्नीची
नव्याने आयुष्य सुरु सहा दिवसाचे विवाहित
जिवंत जिवाची होती का हो दशलक्ष किम्मत
अश्रुनी भिजली, रक्ताने रंगली भारतमाता
अनाथ, विधवा क्षणात झाली धगधगती चिता
काळोखाची उघडून मूठ सूर्य क्षितिजे निजला
अग्नी दाह, प्रकाश कोण्या समुद्रात हो भिजला

– श्रीमती कल्पना दिलीप मापूसकर
मीरा रोड ९०८२६ ४६४९४

### वणवा

वणवा पेटला मनी
पसरला रानोरानी
वणवा भडके मनी
क्षणांची राख रांगोळी...१
वणवा पेटतो मोप
होई भावनांचा लोप
नाही एव्हढे ते सोप
कोमेजले प्रेम रोप....२
आयुष्याला रुखरुख
वणव्याची दाहकता
मनी आहे प्रेम खूप
कोणा न ते उमजता.....३
रोगी वेल्हाळ वणवा
पसरे सुसाट सुसाट
करी भावनेचा नाश
तोही अफाट अफाट....४
वणव्याची रोगराई
पसरे ती तारुण्यात
पडे तरुण तरुणी
एकतर्फी त्या प्रेमात....५
भावना न कळण्याचा
वणवा हा विरहाचा
मन संयोग होईना
अतीव त्या वेदनेचा.....६
भाव निर्मळ प्रेमळ
खरा कळेनाच कोणा
पवित्र मनाचे मात्र
असूनही दिठी सोना....७
आयुष्या कस्तुरी गंध
मुळी लाभता लाभेना
वणवा होई सीमांत
ग्रहण त्याचे सुटेना.....८
वणवा लई सुरेख
नकोशा गोष्टींचा नाश
मन होई तृप्त तृप्त
निस्सीम प्रीतीचा वास....९
वणवा वाटे हवासा
कसा बांधुनी कयास
एकनिष्ठ प्रामाणिक
राहण्याचाच प्रयास.....१०

– सौ. जयश्री अर्जुन मुंडे
अंबाजोगाई

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559